नियमीत फौजदारी खटला क्र. **२४६/२०१७**
निशाणी क्र. **१४/क**

**<u>कलम २४४(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **विभा विनोद चव्हाण**
वय सुमारे : ५९ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त
निवासस्थान : मु. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>:**

मी जिल्हा जात पडताळणी समिती क्र. ०१, अलिबाग येथे निरीक्षक या पदावर कार्यरत होते. शासनाने समिती गठीत केलेली आहे त्यामध्ये अध्यक्ष दिलीप हळदे, संशोधन अधिकारी सलीमा तडवी व उपायुक्त विशाल नाईक हे होते. जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन संबंधितांना जातीचे दाखले देणे हे या समितीचे काम होते.

०२. सन २०१४ मध्ये नुतन थोरवे या महिलेने कुणबी या जातीचे प्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली होती. त्याप्रमाणे समितीने कागदपत्रांची पडताळणी करुन कुणबी समाजाचे प्रमाणपत्र दिले होते. सन २०१५ मध्ये या प्रमाणपत्राच्या विरुद्ध वैजयंती पाटील नावाच्या महिलेने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. न्यायालयाने सदरचे प्रकरण पुन्हा समितीकडे द्यावे व कागदपत्रांची पुन्हा पडताळणी करावी असे आदेश दिले होते.

०३. सन २०१६ मध्ये कागदपत्र पडताळणीकरीता प्राप्त झाल्यानंतर ते दक्षता पथकाकडे नुतन थोरवे यांचे जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरीता दिले होते. त्याप्रमाणे दक्षता पथकाने गाव नमुना क्र. १४ ची पडताळणी केली व तहसिलदारांचा लेखी अहवाल घेतला. त्यामध्ये नुतन थोरवे यांनी त्यांचे आजोबा रामभाऊ गोविंद थोरवे, जात

कुणबी मराठा असे प्रमाणपत्र सादर केले होते. परंतु ज्यावेळी दक्षता पथकाने कर्जत येथील तहसिल कार्यालयात गाव नमुना १४ ची पडताळणी केली असता अनु. क्र. २ वर कुंड्या शिवाजी थोरवे असे नाव आढळून आले व त्यांची जात मराठा असल्याचे नमूद असल्याचे दिसून आले. त्याबाबतचा लेखी अहवाल तहसिलदारांनी दिलेला आहे.

०४. सन २०१७ मध्ये नुतन थोरवे यांचे कुणबी या जातीचे दिलेले प्रमाणपत्र रद्द केले. यातील आरोपी यांनी समितीपुढे जातीची खोटी कागदपत्रे सादर करुन शासनाची फसवणुक केलेली आहे. समितीने मला आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याबाबत आदेशित केले, त्याप्रमाणे मी सदर तक्रार कागदपत्रांसह दाखल केलेली आहे.

**कागदपत्र दाखल करण्यासाठी पुढील सरतपास तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

( **शै. वा. उगले** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

अलिबाग.

दिनांक : **१४/०८/२०२३.**

**<u>पुढील सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>:**

०५. मी कागदपत्र दाखल केलेले आहेत. मी कास्ट व्हॅलीडीटी प्रमाणपत्र, कास्ट सर्टीफिकेट, आरोपीच्या वडीलांचा शाळा सोडल्याचा दाखला, गाव नमुना १४, आरोपीचा शाळा सोडल्याचा दाखला, जात पडताळणी कमिटीचा दक्षता पथकाने केलेला फेरतपासणी अहवाल ज्यामध्ये गाव नमुना १४ समाविष्ट आहे इत्यादी कागदपत्र दाखल केलेले आहेत. सदर कागदपत्रांची सहाय्यक अधिक्षक यांनी केलेली व्हेरीफाईड प्रत मी न्यायालयात दाखल केलेली आहे.

०६. कोकण भवन येथील त्रिसदस्यीय समितीने ओ.बी.सी. असे नमूद असलेले आरोपीस व्हॅलीडीटी सर्टीफिकेट दिलेले आहे. सदर मूळ प्रत आज रोजी मी न्यायालयात सोबत आणलेली आहे. मूळ प्रतीप्रमाणे व्हॅलीडीटी सर्टीफिकेटची सत्यप्रत बरोबर आहे. कास्ट व्हॅलीडीटी सर्टीफिकेटला ओळखीकरीता **निशाणी क्र. ४७** देण्यात येते.

०७. आरोपीच्या कास्ट सर्टीफिकेटची सत्यप्रत मी दाखल केलेली आहे त्यावर कुणबी जात असे नमूद केलेले आहे. तहसिलदार, कर्जत यांनी व्ही.एस. बैरागडे, पोलीस निरीक्षक, दक्षता पथक यांना दिलेल्या पत्राची मूळ प्रत मी आज कोर्टात आणलेली आहे. त्याची सत्यप्रत मी दाखल केलेली आहे. सत्यप्रत मूळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे. त्या पत्रामध्ये 'मराठा' अशी जात नमूद आहे. पत्राच्या सत्यप्रतीस **निशाणी क्र. ४८** देण्यात येते. गाव नमुना १४ मध्ये आरोपीच्या आजोबांचे नाव जे आहे ते आरोपीच्या आजोबांचे मूळ नाव जे कागदपत्र पडताळण्यात आले त्यामध्ये नाही.

०८. मी आरोपीला ओळखू शकेन. आरोपी आज न्यायालयात हजर नाही. (आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे.)

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. विद्देश गोंदकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.　　　( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१२/०१/२०२६**.　　　मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **२४६/२०१७**
निशाणी क्र. **५०/क**

**<u>फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४४ अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

माझे संपूर्ण नांव : **अविनाश बाजीराव कोष्टी**
वय सुमारे : ४९ वर्षे, व्यवसाय : उपजिल्हाधिकारी, बांद्रा, मुंबई उपनगर जिल्हा
निवासस्थान : मु. ठाणे हिरानंदानी इस्टेट, ठाणे

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>:**

०१. सन २०१६ मध्ये मी तहसिलदार कर्जत म्हणून कार्यरत होतो. गुन्ह्याच्या संदर्भात माझ्याकडून जात पडताळणीसंदर्भात जिल्हा जात पडताळणी समिती क्र. ०१, अलिबाग यांनी गांव नमुना क्र. १४ चा उतारा पडताळणी करुन मागितला होता. मी दक्षता पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. वैरागडे यांना जात पडताळणीबाबत पत्र दिले. निशाणी क्र. ४८ कडील पत्र तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सोबत मी सुर्याजी गुंड्या शिवा थोरवे यांचा जन्म नोंदीचा उतारा दिला होता. त्या उताऱ्यामध्ये जन्माची नोंद २३/०४/१९५० अशी असून जात 'मराठा' व गाव 'पोसरी' असे नमूद आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. विद्देश गोंदकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **३०/०१/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **२४६/२०१७**
निशाणी क्र. **५३/क**

**<u>कलम २४४ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारोपापूर्वीचा पुरावा</u>**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **विशाल गणपत नाईक** |
| वय सुमारे | : | ४३ वर्षे, व्यवसाय : नोकरी |
| निवासस्थान | : | सातरस्ता, महालक्ष्मी, मुंबई |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी. एस्. पाटील यांचेमार्फत</u>:**

०१. सन २०१७ मध्ये मी जिल्हा जात पडताळणी समिती क्र. ०१, अलिबाग येथे कार्यरत असताना अर्जदार नूतन दिलीप थोरवे यांनी निवडणूक कामाकरिता जात प्रमाणपत्र पडताळणीकरीता अर्ज केला होता. त्या अर्जासोबत त्यांनी त्यांच्या आजोबांचा गांव नमुना क्र. १४ जोडला होता. त्यात आजोबांचे नाव रामभाऊ गोविंद थोरवे असे नमूद होते. तसेच जन्मतारीख २३/०४/१९५० अशी नमूद होती. त्यामध्ये जातनोंद 'मराठा कुणबी' अशी नमूद होती. तो दाखला लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील होता. सदर गांव नमुना क्र. १४ जात पडताळणी अधिनस्थ दक्षता पथकामार्फत तपासण्यात आला असता तो गांव नमुना क्र. १४ खोटा व बनावट असल्याचे आढळून आले. अनु. क्र. २ मध्ये जन्मतारीख दि. २३/०४/१९५० अशी नमूद होती. मूळ गांव नमुना क्र. १४ मध्ये सुर्याजी कुंड्या शिवा थोरवे असे नमूद होते. त्यावर जातनोंद 'मराठा' म्हणून नमूद होती. प्रस्तुत समितीने त्यांचा जात दावा अवैध ठरवून निर्णय पारित केला. त्यानंतर फिर्याद दाखल केली.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. विद्‌देश गोंदकर यांचेमार्फत</u>** :

उलटतपास दोषारोप निश्चित होईपर्यंत तहकूब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **२०/०२/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.